**संगणकीकृत डिजीटल सर्व्हे नंबर/ गट नंबरचे भूमापन नकाशे व नगर भूमापन, गावठाण भूमापन, स्वामित्व योजनेतील नकाशे हे शासनाने इतर विभाग, वित्तीय संस्था व इतर यांना API द्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२१/प्र.क्र.२३५/भूमापन**

पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २९ जुलै २०२६.

**वाचा :-**

१. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. राभूअ-२०१९.क्र.प्र/२८९-ल/१.दि ,०२.०७.२०२०.
२. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२१.क्र.प्र/२३५-ल/१.दि ,२९.११.२०२२.
३. जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेखपुणे यांचे पत्र ,महाराष्ट्र राज्य , क्र. भूमापन-४/ई.ऑ. क्र. १८४०२७०/२०२५, दि.१७.०६.२०२५.

**प्रस्तावना :-**

राज्यात डिजिटल भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम “ई-महाभूमि” या नावाने राबविण्यात येत आहे. ई-महाभूमि अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या आज्ञावलीच्या माध्यमातून डिजिटल अधिकार अभिलेखाच्या नक्कला संगणकीकृत डिजिटल स्वाक्षरीसह ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. राज्यामधील मूळ जमाबंदीच्या वेळी तयार झालेले भूमापनाचे सर्व्हे नंबरचे नकाशे, एकत्रीकरण योजने अंतर्गत तयार झालेले गट नंबरचे नकाशे, नगर भूमापन नकाशे, गावठाण भूमापन नकाशे, तसेच स्वामित्व योजनेअंतर्गत तयार झालेले गावठाण भूमापन नकाशे यांचे स्कॅनिंग व डिजीटायझेशनचे काम पूर्ण झाले असून सदरचे नकाशे नागरिकांना व शासकीय संस्थांना अवलोकनार्थ भूनक्शा पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सदर डिजिटल स्वरूपातील नकाशे शासनाने इतर विभाग, वित्तीय संस्था व इतर यांना सेवा शुल्क आकारून उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

राज्यात मूळ जमाबंदी वेळी तयार झालेले भूमापनाचे सर्व्हे नंबरचे नकाशे, एकत्रीकरण योजने अंतर्गत तयार झालेले गट नंबरचे नकाशे, नगर भूमापन नकाशे, गावठाण भूमापन नकाशे तसेच स्वामित्व योजने अंतर्गत तयार झालेले गावठाण भूमापन नकाशे Application Programming Interface (API) द्वारे उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्यासाठी खालीलप्रमाणे शुल्क निश्चित करण्यात येत आहे.

**अ) सर्व्हे नंबर/ गट नंबरचे भूमापन नकाशे, नगर भूमापन, गावठाण भूमापन, स्वामित्व योजनेतील भूमापन नकाशे**

| अ. क्र. | वापरकर्ता | देण्यात येणारा नकाशा माहितीचे स्वरुप | | शुल्क सुविधा | प्रस्तावित सेवाशुल्क (रुपये) प्रती स.नं. / ग.नं. /हिस्सा नं. (चतु:सिमा सह) | विविध घटकांचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नागरिक | नक्कल डाउनलोड करणे. | संगणकी कृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | प्रिपेड वॉलेट | ६० | महाराष्ट्र शासन - रु.४०/-<br>जमाबंदी आयुक्त यांचे PLA - रु.२०/- |
| | | | (२) संगणकी कृत स्वाक्षरीने .dwg स्वरुपात | | १२० | महाराष्ट्र शासन - रु.८०/-<br>जमाबंदी आयुक्त यांचे PLA - रु.४०/- |
| | | | (३) .shp स्वरुपात | | १२० | |
| २ | सरकारी /खाजगी बँका | (१) नक्कल डाउनलोड करणे. | (१) संगणकी कृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | पोस्ट पेड १ महिना क्रेडिट | ६० | महाराष्ट्र शासन - रु.४०/-<br>जमाबंदी आयुक्त यांचे PLA - रु.२०/- |
| | | | (२) संगणकी कृत स्वाक्षरीने .dwg स्वरुपात | | १२० | महाराष्ट्र शासन- रु.८०/-<br>जमाबंदी आयुक्त यांचे PLA - रु.४०/- |
| | | | (३) .shp स्वरुपात | | १२० | |
| | | (२) API द्वारे data Streaming | Geo JSON | | १२० | |
| ३ | महाराष्ट्र शासनाचे प्रशासकीय विभाग | (१) नक्कल डाउनलोड करणे. | (१) संगणकी कृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | निशुल्क | | |
| | | | (२) संगणकी कृत स्वाक्षरीने .dwg स्वरुपात | | | |
| | | | (३) .shp स्वरुपात | | | |
| | | (२) डेटा स्ट्रीम (डेटा स्वरुपात) डाउनलोड करणे. | Geo JSON | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | **भारत सरकार, सार्वजनिक उपक्रम, सार्वजनिक महामंडळे, स्वायत्त संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था** | (१) नक्कल डाउनलोड करणे. | (१) संगणकी कृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | पोस्ट पेड १ महिना क्रेडिट | ४५ | महाराष्ट्र शासन - रु.२०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.१०/- |
| | | | (२) संगणकी कृत स्वाक्षरीने .dwg स्वरुपात | | ६० | महाराष्ट्र शासन - रु.४०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.२०/- |
| | | | (३) .shp स्वरुपात | | ६० | |
| | | (२) डेटा स्ट्रीम (डेटा स्वरुपात) डाउनलोड करणे. | Geo JSON | | ६० | |

**टिप** - १) संपूर्ण गाव नकाशाची मागणी केल्यास रक्कम रु. ५०००/- याप्रमाणे आकारणी करण्यात यावी. त्यापैकी महाराष्ट्र शासनाचा हिस्सा रू.३०००/- व जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.२०००/- अशी विभागणी असेल.

२) प्रत्येक टिक्का/नगर भूमापन आलेखासाठी प्रति आलेख रुपये ५००/- या दराने शुल्क आकारण्यात यावे. त्यापैकी महाराष्ट्र शासनाचा हिस्सा रू.३००/- व जमाबंदी आयुक्त यांचे PLA रू.२००/- अशी विभागणी असेल.

३) स्वामित्व योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या गावठाण भूमापन नकाशासाठी प्रति गावठाण भूमापन नकाशा रुपये २०००/- या दराने शुल्क आकारण्यात यावे. त्यापैकी महाराष्ट्र शासनाचा हिस्सा रू.१५००/- व जमाबंदी आयुक्त यांचे PLA रू.५००/- अशी विभागणी असेल.

## ब) संगणकीकृत डिजीटल स्वाक्षरीने मिळकत पत्रिका

| अ. क्र. | वापरकर्ता | देण्यात येणा-या मिळकत पत्रिका माहितीचे स्वरुप | शुल्क सुविधा | प्रस्तावित सेवाशुल्क | विविध घटकांचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **नागरिक (एकल)** | संगणकीकृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | प्रिपेड वॉलेट | महानगरपालिका क्षेत्राकरीता रु.१३५/- प्रति अभिलेख | महाराष्ट्र शासन - रु.९०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.४५/- |
| | | | | अ ब क वर्ग नगरपालिका/ नगरपंचायत क्षेत्राकरीता रु.९०/-प्रति अभिलेख | महाराष्ट्र शासन- रु.६०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.३०/- |
| | | | | ग्रामीण क्षेत्राकरीता रु.४५/- प्रति अभिलेख | महाराष्ट्र शासन- रु.३०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.१५/- |
| २ | **सरकारी /खाजगी बँका** | १) संगणकीकृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | पोस्टपेड १ महिना क्रेडीट | महानगरपालिका क्षेत्राकरीता रु.१३५/- प्रति अभिलेख | महाराष्ट्र शासन- रु.९०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.४५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अ ब क वर्ग नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्राकरीता रु.९०/- प्रति अभिलेख | महाराष्ट्र शासन- रु.६०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.३०/- |
| | | | | ग्रामीण क्षेत्राकरीता रु.४५/- प्रति अभिलेख | महाराष्ट्र शासन- रु.३०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.१५/- |
| | | २) संगणकीकृत स्वाक्षरीने डेटा स्ट्रीम (डेटा स्वरुपात) | | महानगरपालिका क्षेत्राकरीता रु.१३५/- प्रति अभिलेख | महाराष्ट्र शासन- रु.९०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.४५/- |
| | | | | अ ब क वर्ग नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्राकरीता रु.९०/- प्रति अभिलेख | महाराष्ट्र शासन- रु.६०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.३०/- |
| | | | | ग्रामीण क्षेत्राकरीता रु.४५/- प्रति अभिलेख | महाराष्ट्र शासन- रु.३०/- जमाबंदी आयुक्त यांचे PLA- रु.१५/- |
| ३ | **महाराष्ट्र शासनाचे प्रशासकीय विभाग** | १) संगणकीकृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | निशुल्क | | |
| | | २) संगणकीकृत स्वाक्षरीने डेटा स्ट्रीम (डेटा स्वरुपात) | | | |
| ४ | **सार्वजनिक उपक्रम, सार्वजनिक महामंडळे, स्वायत्त संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था** | १) संगणकीकृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | पोस्टपेड १ महिना क्रेडीट | महानगरपालिका क्षेत्राकरीता रु.४५/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.४५/- |
| | | | | अ ब क वर्ग नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्राकरीता रु.३०/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.३०/- |
| | | | | ग्रामीण क्षेत्राकरीता रु.१५/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.१५/- |
| | | २) संगणकीकृत स्वाक्षरीने डेटा स्ट्रीम (डेटा स्वरुपात) | पोस्टपेड १ महिना क्रेडीट | महानगरपालिका क्षेत्राकरीता रु.४५/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.४५/- |
| | | | | अ ब क वर्ग नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्राकरीता रु.३०/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.३०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ग्रामीण क्षेत्राकरीता रु.१५/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.१५/- |
| ५ | **भारत सरकारचे असे विभाग जे महसूल अभिलेख घेऊन स्व विभागाकडील data share करतात** | १) संगणकीकृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | निशुल्क | | |
| | | २) संगणकीकृत स्वाक्षरीने डेटा स्ट्रीम (डेटा स्वरुपात) | | | |
| ६ | **भारत सरकारचे असे विभाग जे महसूल अभिलेख घेऊन स्व-विभागाकडील data share करत नाहीत.** | १) संगणकीकृत स्वाक्षरीने PDF स्वरुपात | पोस्टपेड १ महिना क्रेडीट | महानगरपालिका क्षेत्राकरीता रु.१/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.१/- |
| | | | | अ ब क वर्ग नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्राकरीता रु.१/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.१/- |
| | | | | ग्रामीण क्षेत्राकरीता रु.१/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.१/- |
| | | २) संगणकीकृत स्वाक्षरीने डेटा स्ट्रीम (डेटा स्वरुपात) | | महानगरपालिका क्षेत्राकरीता रु.१/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.१/- |
| | | | | अ ब क वर्ग नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्राकरीता रु.१/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.१/- |
| | | | | ग्रामीण क्षेत्राकरीता रु.१/- प्रति अभिलेख | जमाबंदी आयुक्त यांचे PLA रु.१/- |

३. वाचा क्र. १ येथे नमूद महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.राभूअ-२०१९/प्र.क्र.२८९/ल-१, दि.०२.०७.२०२० अन्वये महाभूलेख संकेतस्थळावरून e-PCIS अंतर्गत डिजिटल स्वाक्षरीने वितरीत करण्यात येण्यात मिळकत पत्रिका तसेच जुन्या अभिलेखांच्या नक्कला आणि डिजीटाईज्ड नकाशांच्या नक्कलांसाठी शुल्क निश्चित करण्यात आले आहे. सदर शुल्काची रक्कम या शासन निर्णयाव्दारे सुधारित करण्यात येत आहे.

४. API (Application Programming Interface) द्वारे data Streaming ही सुविधा केवळ संस्थासाठी उपलब्ध असेल व त्यासाठी सामंजस्य करार करणे आवश्यक असेल. सदर सामंजस्य करार करण्याचे व सामंजस्य करारामध्ये समाविष्ट करावयाच्या अटी व शर्ती निश्चित करण्याचे अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

५. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे विभाग/महामंडळे, सार्वजनिक उपक्रम व विविध सरकारी/खाजगी बँका यांनी Application programming Interface (APIs) द्वारे विशेषतः Bulk data Download द्वारे उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सेवा वापर करताना कोणत्याही परिस्थितीत डिजीटल

वैयक्तीक डेटा संरक्षण कायदा-२०२३ (The Digital Personal Data Protection Act २०२३) मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्यात यावी.

**६.** सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौ. संदर्भ क्र.२१-अ/सा.स., दि.०८.०५.२०२६ व इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता विभाग यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२९१५१५११२०४८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.07.29 15:17:09 +05'30'

**( संजय बनकर )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव.
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
६. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा.विधानसभा सदस्य व विधानपरिषद सदस्य
८. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१०.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१२.महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१३.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.भूमापन कार्यासन संग्रहार्थ.